PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 1

# वाङ्मयेतिहासलेखनाच्या मर्यादा व समस्या

**श्री वैजिनाथ राख**
शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालयए
वडगाव बु पुणे ४६
**महाराष्ट्र भारत**

वाङ्मयेतिहास हा समाजाच्या प्रज्ञेचा इतिहास असतो. तसेच वाङ्मय हे संस्कृतीचेच एक अंग आहे. कारण वाङ्मयनिर्मितीच्यामुळाला संस्कृती हीच जीवनरस पुरवत असते. कलांचा उगम हा समाजात होत असतो. वाङ्मय ही एक ललित कला आहे. तिचा समाजाशी एकनिष्ठ संबंध आहे. वाङ्मयेतिहास लिहिताना किंवा सिद्ध करताना वाङ्मयाशी निगडीत असणाऱ्या सर्व प्रेरणा, प्रवृत्ती व प्रवाह यांचा वेध घ्यावा लागतो, शोध घ्यावा लागतो. हा शोध घेणारी व्यक्ती किंवा वाङ्मयेतिहास लिहणारा लेखक अनेक गोष्टींचा शोध घेऊन तो सिद्ध करत असतो. यामध्ये एखादी गोष्ट जरी चुकली किंवा नजरेतून निसटली तर तिचा समावेश वाङ्मयेतिहासात होणार नाही. वाङ्मयावर वाङ्मयीन चळवळी, ज्या कालखंडात ते वाङ्मय निर्माण झाले तो कालखंड, राजवटी किंवा शासनव्यवस्था, सांस्कृतिक परिस्थिती, लेखक, प्रकाशक इत्यादी गोष्टीं प्रभाव टाकत असतात. या ‘प्रभाव’ आणि ‘प्रभवांचा’ शोध घेणे वाङ्मयेतिहासकाराला सोपे नसते. कारण या वरील गोष्टींचा शोध घेऊन त्या आधारे वाङ्मयेतिहास लिहिणे ही एक अवघड गोट आहे.

आधुनिक किंवा अर्वाचीन वाङ्मयेतिहास लिहिणे तसे मध्ययुगीन वाङ्मयेतिहास लिहिण्यापेक्षा सोपे काम आहे. कारण याला काहीतरी लिखित, ठळक व स्पष्ट पुरावा असतो. तो त्या काळातील अनेक, समांतर गोष्टींशी पडताळून पाहता येतो. तसेच आधुनिक कालखंडामध्ये ‘मुद्रणकला’ व ‘आधुनिक शिक्षण’ या दोन गोष्टी उपलब्ध होत्या. यांच्या तुलनेत मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहास लिहिणे हे अवघड काम आहे. या काळातील वाङ्मयाचा वाङ्मयेतिहास लिहिताना अनेक मर्यादा पडतात. सुरुवातीला

PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 1

या कालखंडातील वाङ्मयचा इतिहास लिहायचा म्हणजे नेमका कशाचा इतिहास लिहायचा? हाच प्रश्न निर्माण झालेला असेल. कारण वाङ्मय नेमके म्हणायचे कशाला? या कालखंडातील वाङ्मयाच्या निखळ प्रेरणा दिसतात का? आपण आजच्या काळात ज्याला साहित्य म्हणतो, तसे हे वाङ्मय आहे का? कालखंडाच्या दृष्टिकोनातून पाहिल्यावर ही निर्मिती वाङ्मयच आहे, असे म्हणता येते का? परकीय राजवटीत समाज संस्कृतीचा ऱ्हास होणे, हे समाजातील काही विचारवंतांना पाहणे शक्य नव्हते, म्हणून त्यांनी आपापल्या वाङ्मयाची पंथीय दृष्टिकोनातून निर्मिती केली. आता या पंथीय दृष्टिकोनातून लिहिलेल्या वाङ्मयाचे इतिहासलेखन करायचे आणि तेही आठशे ते एक हजार वर्ष उलटून गेल्यावर, ही एक अवघड व कठीण गोष्ट आहे. वाङ्मयेतिहास लेखक ज्या काळात वावरत असतो, त्याच्या आजूबाजूला जे वाङ्मयीन व संस्कृतिक पर्यावरण असते, त्याचा थोडाफार का होईना परिणाम वाङ्मयेतिहास लेखकावर झालेला असतो. त्यामुळे त्याच्या काळातील सामाजिक धारणा समोर ठेऊन तो वाङ्मयेतिहासाकडे पाहत असतो. यावर द.दि.पुंडे म्हणतात, ''आपल्या वर्तमानकालीन जाणिवा—संवेदना जशा असतील, तशा स्वरूपाचा वाङ्मयेतिहास आपल्याला हवाहवासा वाटेल.''[१] ही मर्यादा मध्ययुगीन काळातील वाङ्मयेतिहासलेखन करताना पडते. कारण हे वाङ्मय पाचशे ते आठशे वर्षे जुने व वाङ्मयेतिहासलेखक अलिकडील काळातील आधुनिक शिक्षण घेतलेला. त्यामुळे ते त्यांच्या दृष्टिकोनातून वाङ्मयेतिहासाकडे पाहत असतात.

वाङ्मय व वाङ्मयेतिहासाचा कालपट हा मोठा असतो. कालखंडानुसार लेखन करायचे तर त्यामळे इतर गोष्टींवर अन्याय झाल्यासारखे होईल. लेखकानुसार लेखन करायचे म्हटले तर तो लेखकच त्या काळात परिणामकारक होता असे वाटेल. वाङ्मयप्रकारानुसार लेखन केले तर लेखक आणि काळ यातील बऱ्याच गोष्टी सोडाव्या लागतील. या सर्वांना सामावून समग्रलक्ष्यी लेखन केले तर अनेक पृष्ठांचा व माहितीचा पसारा यात समाविष्ट होईल. त्यात नेमकेपणा येणार नाही. तसेच यासाठी वेळ आणि पैसा खर्च करावा लागेल. मध्ययुगीन काळात वाङ्मयेतिहासलेखनाला अनेक मर्यादा पडतात. कारण त्या काळात मुद्रणकला अस्तित्त्वात नव्हती. जे वाङ्मय होते ते मठ, मंदिरे, आश्रम, देवळे अशा धार्मिक ठिकाणी, त्यात अनेक पाठभेद निर्माण झालेले दिसातात. त्यामळे त्याचा अभ्यास करणे, संशोधन करणे, त्याची कालनिश्चिती करणे, लेखकांचा काल ठरवणे, हे फार अवघड काम आहे. त्यामुळे आपल्याला या काळातील लेखक व वाङ्मयकृती यांच्याबद्दल वेगवेगळी मते दिसतात. उदा. संत ज्ञानदेव एक की दोन. संत नामदेव एक की अनेक.

या कालखंडात वाङ्मयेतिहासलेखनाची जी साधने सापडली त्यांच्या साहाय्याने वाङ्मयेतिहासकारांनी वाङ्मय व लेखक यांची स्थान निश्चिती करून, त्यांची पडताळणी करून वाङ्मयेतिहासलेखन केलेले दिसते. शोधमर्यादा ही एक मोठीच अडचण वाङ्मयेतिहासलेखनाच्या बाबतीत सांगता येईल. म्हणजे मध्ययुगीन काळातील आज जे वाङ्मय आपल्याला दिसते, त्यापेक्षा कितीतरी जास्त वाङ्मय व वाङ्मयप्रकार निर्माण झालेले असतील, परंतु टिकवून ठेवण्याची साधने नव्हती. जेवढे वाङ्मय टिकले तेच आपल्याला दिसत आहे. आज जे वाङ्मय संशोधकांनी उपलब्ध करून दिले आहे, ते हिमनगाचे टोकच आहे, असे म्हणता येईल, हिमनग तर असाच काळाच्या ओघात नाहीसा झाला नसेल कशावरून? असे म्हणायला पण खुप मोठा वाव आहे. त्यामुळे मध्ययुगीन वाङ्मयेतिहासाचा पट लिहून दाखवणे, इतिहास सिद्ध करणे हे आजच्या स्थितीला खूपच अवघड काम आहे. आता त्या काळातील नष्ट झालेले वाङ्मय शोधने ही सुद्धा अवघड गोष्ट आहे. त्यामुळे आज जे वाङ्मय उपलब्ध आहे. त्याचाच वाङ्मयेतिहास सिद्ध करावा लागतो.

मध्ययुगीन वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन होणे हे गरजेचे आहे. कारण आजही मध्ययुगातील बरेच वाङ्मय हे संशोधनाविना पडून आहे. त्याला प्रकाशकही मिळत नाहीत. उदा. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठातील मराठी विभागात महानुभाव पंथाच्या सहा हजार पोथ्या संशोधक व प्रकाशक यांची वाट पाहत पडून आहेत. याला कारण संशोधकांची असलेली उदासिनता, आता हे वाङ्मय कोणीच वाचत नाही, ते कालबाह्य झालेले आहे, असे प्रकाशकांचे सांगणे. परंतु या वाङ्मयाचे संशोधन व प्रकाशन झाले तर मध्ययुगीन वाङ्मयेतिहासात मोठी भर पडेल.

अलिकडे शिक्षण घेतल्यामुळे, साहित्याचा अभ्यास केल्यावर अनेकजण साहित्यलेखन करत आहेत. अनेकजण वाङ्मयीन कलाकृती प्रकाशित करतात. त्या कलाकृती नंतर सहजासहजी उपलब्ध होत नाहीत, त्याच्या नोंदी वाङ्मयेतिहासात कशा करायच्या, याचाही एक मोठा प्रश्न आहे. त्याचे कारण कलाकृतींचे संकलन करणे ही एक अवघड गोष्ट आहे. त्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद व महाराष्ट्र राज्यशासन यांनी काही गोष्टी वाङ्मयेतिहासलेखनाबद्दल ठरविल्या आहेत का? वाङ्मयाच्या भरणपोषण करणाऱ्या संस्था व वाङ्मयेतिहास लिहिणाऱ्या संस्था, लेखक यांनी काही धोरण ठरविले आहे का? तसे धोरण ठरविणे सोपे नाही. वाङ्मयाचा शोध घेणे, संशोधन करणे हे काम सोपे नाही. त्यामुळे आधुनिक काळात वाङ्मयेतिहासलेखनाची ही एक मर्यादा सांगता येते.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्यांच्या पाच प्रती या शासकीय ग्रंथालयाकडे पाठवाव्या लागतात, असा नियम आहे. याचा एकच उद्देश आहे, जरी ते पुस्तक नंतर उपलब्ध झाले नाही, तरी शासकीय ग्रंथालय ते उपलब्ध करून देते. हे बंधन पाळणे अनिवार्य आहे. परंतु कितीजण हे बंधन पाळतात, हा शोधाचा मुद्दा होईल. परंतु यामुळे अनेक कलाकृती किंवा वाङ्मय हे वाङ्मयेतिहासात समाविष्ट होत नाही. इतके सर्व प्रयत्न करूनही वाङ्मयेतिहासलेखन झाले तरी त्यात मोजकेपणा किती येईल, हाही एक प्रश्न आहे. हे सर्व काम वाङ्मयेतिहासलेखकांवर अवलंबून असते. वाङ्मयेतिहासलेखनाच्या अशा अनेक अडचणी व समस्या सांगता येतील.

## संदर्भ

१. द. दि. पुंडे, ‘वाङ्मयेतिहास : आठ निबंध’,प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००३ पृ. १९